# गणपतची सहल...

## अणू वीज केंद्राच्या सहलीची गोष्ट...




भाग-2

आतापर्यंत आपण वाचलत, की समीरने कशा रीतीने गणपत आणि इतर गावकऱ्यांना अणू वीज केंद्राबद्दलची सर्व माहिती दिली...

त्याने गावकऱ्यांना फक्त अणू वीज केंद्रामुळे होणाऱ्या फायद्यांबद्दलच सांगितले नाही, तर त्यांच्या मनात कित्येक वर्षे चालत आलेले अज्ञान आणि परंपरावादी मानसिकतेला दूर करण्याचाही प्रयत्न केला. त्याच्या या प्रशंसनीय प्रयत्नांमुळे, अणू ऊर्जेबद्दल गावकऱ्यांच्या मनात असलेल्या शंका आणि गैरसमज बऱ्याच प्रमाणात समाप्त झाल्या आणि त्याचबरोबर त्याने गावकऱ्यांना अणू वीज केंद्राला  सहल नेण्याचं जे वचन दिलेलं होतं, तेही त्याने पूर्ण केलं.

चला तर, गणपत आणि गावकऱ्यांसोबत जाऊ या अणू वीज केंद्राच्या रोमांचक सहलीला....

पाहू या गणपत आणि गावकरी या सहलीचा आनंद कसा लुटतात ते....




मागच्या वेळेस समीर अणू वीज केंद्रावर सहल नेण्याबद्दल बोलल्यानंतर सर्व गावकरी सरपंचांच्या घरी पोहोचतात... आणि त्यांना अणू वीज केंद्रावर सहल घडवून आणण्याची विनंती करतात...
(सरपंच समीरला फोन लावतात...) हॅलो, समीर दादा
काका, नमस्कार !
समीर दादा, गणपतकाका, गंगूताई आणि इतर गावकऱ्यांच्या मनात आहे की अणू वीज केंद्र पहाण्यासाठी सहल न्यावी.... तू तयार आहेस का?
अवश्य ! मी आत्ताच अणू वीज केंद्राच्या अधिकाऱ्यांशी बोलतो आणि थोड्याच वेळात तुम्हाला सांगतो ...
(थोड्या वेळाने....) हॅलो काका,
हॅलो, हां बोल समीर दादा, तुझं बोलणं झालं का?


होय काका, मी त्यांच्याशी बोललो आणि ते लोकही आनंदाने तयार झाले आहेत... मी दोन दिवसांनी गावाकडे येईन ... आणि तुम्हाला सर्वांना येऊन भेटेन... आणि हो, गणपतकाका, गंगूताई आणि इतर सर्वांना सांगा की सर्वांनी तयार राहा... मी दोन दिवसांनी तिथे पूर्ण तयारीनिशी पोहोचेन आणि त्यांना तारापुर अणू वीज केंद्राच्या सहलीला नेईन... आता मी फोन ठेवतो... दोन दिवसांनी भेटेन... नमस्कार , काका.
आशीर्वाद आहेत तुला....
तर मग गणपत तुझं काम तर झालं... आता तुम्हा लोकांची सहल पक्की.. हा...हा...हा... (सरपंच आणि सर्व गावकरी हसतात...)
ठीक आहे सरपंच, आता आम्ही सर्वजण निघतो, दोन दिवसांनी सकाळी 8 वाजता आपण सारेजण इथेच भेटूया.... तोपर्यंत राम राम...
नमस्कार लोकहो, राम राम !
दोन दिवसांनी.. सर्व गावकरी सरपंचांच्या घराच्या दिशेने जाताना..


राम राम सरपंच !
राम राम, राम-राम! आलात का तुम्ही सर्वजण... मी तुमची वाटच पाहात होतो...
पण सरपंच, समीरदादा कुठे आहे? तो तर कुठेच दिसत नाही....
होय सरपंच, मलाही तो कुठे दिसला नाही..
कदाचित असं तर झालं नसेल, की समीरदादाने आपल्याला खोटंच सांगितलंन...
हो, लहानपणीदेखील तो अशाच खोड्या करायचा...
(सगळेजण एकमेकात कुजबूज करायला लागतात आणि एकमेकाच्या तोंडाकडे पाहू लागतात.)


(हसत हसत) अरे नाही बाबांनो... असं अजिबात होणार नाही... थोडा धीर धरा... समीरदादा येईलच आता... तो पहा, आलाच तो...
(तेवढ्यात समीर एका मोठ्या बसमधून खाली उतरतो आणि गावकऱ्यांच्या दिशेने येऊ लागतो.)
नमस्कार, काका !
तुला आशीर्वाद ... आनंदात राहा,
तुम्हाला सर्वांनादेखील माझा नमस्कार ! अरे वा, तुम्ही सारेजण आज फारच छान दिसता आहात... काय गणपतकाका, आज तुम्ही तर फारच खुशीत दिसताय...
होय दादा, अणू वीज केंद्रावर सहलीला जाण्याच्या विचाराने मला फारच आनंद झालाय... वाटतंय, तिथे काय काय असेल... केवढे मोठे असेल...
होय दादा, आम्ही सगळेदेखील तिथे जाण्यासाठी फारच उत्सुक आहोत...


तर मग चला,  आता उशीर कशाला?
सर्वजण या बसमध्ये बसा आणि
थोड्याच वेळात आपण तिथे पोहोचू.
ठीक आहे दादा,
(सर्वजण बसमध्ये बसण्यासाठी
बसच्या दिशेने चालू लागतात....)
(थोड्या वेळाने बस
सुरू होते...)
काय, गणपतकाका,
कसं काय वाटतंय? ...
मजा वाटतेय ना?
होय दादा, आम्हाला सर्वांनाच फार मजा वाटतेय,  आता बस कधी एकदा
तिथे पोहोचेल असं झालंय... पण दादा, एक गोष्ट तर तुला विचारायची विसरूनच गेलो...
काय झालं काका?
काय विचारायचं
विसरलात?
हेच .... की अणू वीज केंद्रात तुझी इतकी ओळख कशी झाली?
तुला इतकी जास्त माहिती कशी मिळाली?
हे तू केलंस तरी कसं?


(हसत हसत..) मला माहीत होतं काका, की तुम्ही मला हा प्रश्न नक्की विचारणार... मी जेव्हा माझा इंजिनिअरिंगचा अभ्यास करीत होतो, तेव्हा मला तारापुर अणू वीज केंद्रात दोन महिन्यांसाठी प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली आणि मी तिथे दोन महिने राहून सर्व गोष्टी अगदी बारकाईने पाहिल्या... म्हणून तर मी तुम्हाला अणू वीज निर्मितीबद्दल त्या दिवशी सर्व गोष्टी सांगितल्या ... समजलं ना काका?
समजलं, समजलं... तू तर खरोखरच फारच समजदार झालेला आहेस
(थोड्या वेळाने बस अचानक अणू वीज केंद्राच्या मेन गेटवर थांबते)
चला काका, आलं आता अणू वीज केंद्र.. आपण सर्वजण इथे पोचलो आहोत.. आता सर्वांनी बसमधून उतरून एका रांगेत उभे राहा... मी सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर बोलून येतो...
तारापुर परमाणू विद्यूत घर
ठीक ठीक, समीरदादा... जसं तू म्हणशील तसं...
सर्व गावकरी खाली उतरतात आणि एका बाजूला उभे राहतात.... तिथली सुरक्षा व्यवस्था पाहून ते चकितच होतात...
समीर सुरक्षा गेटजवळ असलेल्या खोलीत जातो..
तेवढ्या वेळात गणपत आणि इतर गावकरी दारातून आत पाहतात..
तुमच्यापैकी कोणाजवळ मोबाईल, कॅमेरा किंवा इतर साधने असतील तर कृपया ती येथेच जमा करा... अणू वीज केंद्राच्या आत या सर्व गोष्टी नेण्यास बंदी आहे...
आता तुम्ही सर्वजण पाळीपाळीने आपला पास तयार करून घ्या.
(सर्वजण आपापला मोबाइल, कॅमेरा इ. जमा करतात.)
Entry Pass
(सर्व लोक एकेक करून प्रवेशपत्र तयार करून घेतात)


तेवढ्यात समीर दोन अधिकाऱ्यांबरोबर तेथे पोहोचतो.
अच्छा समीरजी... या सर्वांचा पास तयार झालेला आहे, आता आपण सर्वजण बसमध्ये जाऊन बसावे. येथून आपण अणू वीज केंद्रात प्रवेश करणार आहात. तेथे आणखी एक सुरक्षा चौकी असेल तेथे तुमची झडती घेतली जाईल आणि तुम्हाला आत जाण्याची परवानगी मिळेल...
आपले मन:पूर्वक आभार, सर !
तारापुर परमाणू विद्यूत घर
(समीर अधिकाऱ्यांना गावकऱ्यांची ओळख करून देतो.)
काका, हे अमितकुमार आहेत, आणि आपल्याला यापुढची सहल अमितकुमारजी घडवून आणणार आहेत...
तुम्हाला सर्वांना माझा नमस्कार ! तारापुर अणू वीज केंद्रात आपले सर्वांचे स्वागत आहे. चला, आता आपण सर्वजण आत जाऊ या...
(सर्वजण बसमध्ये जाऊन बसतात. दरवाजा उघडतो आणि बस आत प्रवेश करते...)




बंधुभगिनींनो, आता आपण ज्या भागातून जातो आहोत त्याला एक्स्क्लूजन झोन असे म्हणतात. इथे परवानगीशिवाय प्रवेश मिळत नाही.
अच्छा, पण मग इथे काय काम चालतं?
अणू वीज केंद्राच्या चारी बाजूंना 1.6 किलोमीटर क्षेत्रात दाट वृक्ष आणि जंगल आहे, जिथे हिरवेगार वातावरण असल्यामुळे लाखो पक्षी, फुलपाखरे आणि जिवांचे संरक्षण केले जाते.... ज्यामुळे वातावरण फारच स्वच्छ राहते.
अरे वा! खरंच, इथे तर खूपच हिरवळ आहे... चारी बाजूला स्वच्छ वातावरण आहे... आणि मग आम्हालाही चिमण्या आणि फुलपाखरं पहायला मिळतील का?
अवश्य, अरे दादा, जरा पुढे गेल्यावर डाव्या हाताला थांबव...
(बस थांबते आणि लोक खाली उतरुन तिथे फिरु लागतात)


अरे वा, किती सुंदर दृश्य आहे....
खूपच सुंदर वातावरण आहे.... पहा तरी, किती सुंदर चिमण्या आहेत....


अरे, तो पहा मोर...
किती सुंदर आहे...
अगदी बरं वाटलं
हे सारं पाहून..



खरंतर, सुरक्षिततेच्या दृष्टीने हे ठिकाण फारच महत्त्वाचे असते आणि या क्षेत्राचा उपयोग आम्ही केवळ या दुर्मिळ पक्ष्यांच्या संरक्षणासाठीच करीत नाही, तर संकटकाळी किंवा अणू वीज केंद्राच्या ठिकाणी जर काही अपघात झाला तर त्यातून निघणाऱ्या किरणोत्सर्गाचा फैलाव पुष्कळशा प्रमाणात रोखला जाऊ शकतो.
ओहो ! असं आहे तर.... तरीच अणू वीज केंद्राच्या चारी बाजूंना 1.6 किलोमीटरचा एक्सक्लूजन झोन तयार केला जातो...
(यानंतर सर्व लोक पुन्हा एकदा बसमध्ये बसून आतल्या बाजूला जाऊ लागतात... थोड्या वेळाने अणू वीज केंद्राचे दुसरे गेट दिसू लागते...)
बंधुभगिनींनो... आता आपण सर्व लोक एकेक करून बसमधून खाली उतरावे ... इथून आता आपण सुरक्षा केंद्रातून मग पुढे अणू वीज केंद्रात प्रवेश करणार आहोत....
हो, ठीक आहे.... (सर्व लोक खाली उतरतात... आणि सुरक्षा तपासणी ठिकाणावर तपासणी करून अणू वीज केंद्राच्या आत प्रवेश करतात...)
(सुरक्षा तपासणीतून पुढे जाताना..)


(आत पोहोचताच अणू वीज केंद्राचे सुंदर दृश्य दुरूनच दिसते, जे पाहून सर्व गावकऱ्यांना अतिशय आनंद होतो...)
अरे बापरे ! हे केवढे तरी मोठे आहे....
अरे वा, फारच सुंदर दृश्य आहे हे....



आता मी तुम्हा सर्वांना याची सहल करवतो...
तुम्हा साऱ्यांना हा जो गोल घुमटासारखा आकार दिसतो आहे, ते रिॲक्टर भवन आहे... ही अणू वीज केंद्रातील सर्वात महत्त्वाची जागा आहे, जिथे वीज तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली जाते... या भवनात मुख्यत: दोन भिंती असतात.. पहिली भिंत आणि दुसरी भिंत... दोन्ही भिंती काँक्रीटच्या बनवलेल्या आणि अतिशय मजबूत असतात...
अच्छा! आम्हाला ते आतूनही पाहता येईल का?


अवश्य... तुम्ही खुशाल याच्या आत जाऊ शकता, पण आत जाण्यापूर्वी तुम्हा सर्वांना काही विशिष्ट प्रकारचे कपडे आणि हातमोजे घालावे लागतील...
चला तर, मी आता तुम्हा सर्वांना आतून सहल करवून आणतो...
(यानंतर सर्व लोक विशिष्ट प्रकारचे कपडे, हातमोजे आणि टी. एल.डी./ डोजीमीटर नावाचे साधन घालून आत प्रवेश करतात...)
अच्छा सर, आम्हाला हे सांगा, की या भवनात दोन भिंती का बांधलेल्या आहेत... आमच्या घरांमध्ये तर फक्त एकच भिंत असते...
फारच चांगला प्रश्न विचारला आहे गणपतने... खरं तर सुरक्षिततेच्या दृष्टीने आम्ही दोन भिंतीं तयार करतो.... जर काही अपघातामुळे किरणोत्सर्ग अगदी थोड्या प्रमाणात जरी बाहेर पडला तरी तो पहिल्या भिंतीच्या आतपर्यंतच सीमित राहील... समजा अगदी कठीण परिस्थितीत किरणोत्सर्ग पहिल्या भिंतीतून बाहेर गेला तर दुसऱ्या भिंतीमुळे तो अडवला जाईल... शिवाय दोन्ही भिंतींच्या मध्ये आम्ही मोकळी जागा ठेवलेली आहे, ज्यामुळे किरणोत्सर्ग तेथपर्यंतच सीमित राहील... आता तुम्हाला कळलं का, की आम्ही दोन भिंती का बनवतो?
पण या भिंती किती मजबूत असतात ? त्या तुटू शकतील का ?


हा हा हा... (हसत हसत) रघुकाका, या भिंती इतक्या शक्तिशाली बनवल्या जातात की जरी एखादं जेट विमान जोराने येऊन त्यावर आदळलं तरीही या भिंतींवर काहीही परिणाम होणार नाही, समजलं?... आणि प्रत्येक भिंतीची जाडी साधारण 1 मीटर पर्यंत असते.
बरं !
(यानंतर रिॲक्टर बिल्डिंगमध्ये फिरता फिरता सर्व लोक दरवाज्यातून आत प्रवेश करतात आणि कॅलेंड्रियापर्यंत पोहोचतात... तिथे पोहोचल्यानंतर त्यांना एका जागी काचेची एक छोटीशी खिडकी दिसते... सर्वजण कुतूहलाने आत पाहण्याचा प्रयत्न करतात....) हे काय आहे?
याच्या आत तर खूपच छिद्रे दिसत आहेत...
अरे, याच्या आत हे गोल आकाराचं काय आहे?


ज्याप्रमाणे आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे हृदय असते, त्याचप्रमाणे हे अणू वीज केंद्राचे हृदय आहे आणि त्याला कॅलेंड्रिया असे म्हणतात. यात खूपच छिद्रे असतात... याच छिद्रांतून आम्ही यूरेनियम नावाचे इंधन आत घालतो, ज्यातील अणूंच्या विघटनामुळे खूप मोठ्या प्रमाणात उष्णता निर्माण होते, व त्यामुळे यातील जड पाणी गरम केले जाते व ते जड पाणी बॉयलरमधील सामान्य पाणी गरम करते व त्यामुळे वाफ निर्माण केली जाते.... ही वाफ टरबाइनच्या पंख्यांना फिरवते आणि टरबाइनचे पंखे जनरेटरच्या सहाय्याने जोडलेले असतात आणि त्यातून वीज निर्माण केली जाते... त्यानंतर त्याला ग्रिडशी जोडले जाते. त्यानंतर त्या ठिकाणापासून ट्रान्स्फॉर्मर आणि विजेच्या तारांच्या मदतीने वीज घराघरापर्यंत पोचवली जाते.
(सर्वजण त्यांचे बोलणे लक्ष देऊन ऐकतात....)
बरं, मला तुम्हाला एक गोष्ट विचारायची आहे.. मला हे सांगा की वीज तयार करण्याच्या प्रक्रियेत जेव्हा इंधन संपून जाते तेव्हा पुन्हा इंधन कसे भरतात? कारण आत तर कोणीच जाऊ शकत नाही....
तुमचं बोलणं ऐकून मला फारच आनंद वाटतोय... तुम्ही खूपच चांगला प्रश्न विचारला आहेत... खरंतर ही संपूर्ण प्रक्रिया कॉंप्युटरच्या मदतीने केली जाते आणि रोबो म्हणजेच यंत्रमानवाच्या मदतीने आम्ही पुन्हा इंधन भरतो... कारण याच्या आत माणसांना प्रवेश वर्ज्य आहे.
(यानंतर सर्व लोकांना अमितकुमार रिॲक्टर भवनाच्या बाहेर घेऊन जातात आणि प्रदूषणाची तपासणी करणाऱ्या यंत्रांजवळ पोहोचतात...)


8.3%
ते काय आहे?
लक्ष्मीताई... आम्ही जेव्हा जेव्हा अणू वीज केंद्राच्या आत रिॲक्टर भवनात काम करून बाहेर पडतो तेव्हा आम्हाला या यंत्रामधून एका बाजूने आत शिरून दुसऱ्या बाजूने बाहेर पडावं लागतं... त्यातून आम्हाला कळू शकतं की आमच्या शरीरामध्ये किंवा कपड्यांत काही संदुषण (किरणोत्सर्गी कण कपड्यांवर आणि शरीरावर चिकटणे) तर नाही ना? आठवतंय, सुरूवातीला आम्ही तुम्हाला विशिष्ट प्रकारचे कपडे, हातमोजे आणि साधने दिली होती....
8.3%
हां, आठवलं...
या सर्व वस्तू आपण सर्वांनी आता काढून ठेवायच्या आहेत आणि पाळीपाळीने या मशीनच्या आत शिरून बाहेर पडायचं आहे... म्हणजे हे कळू शकेल की कोणाला संदुषण तर झालेलं नाही ना..
यानंतर सर्व लोक विशिष्ट कपडे आणि साधने तपासून काढ्तात व एका ठिकाणी ठेवलेल्या बॉक्समध्ये जमा करतात...
(सर्व लोक पाळीपाळीने या मशीनमधून बाहेर जातात..
पाहिलंत, हे हिरव्या रंगाचं बटन चमकायला लागलं म्हणजे मशीनने सांगितलं की कोणालाही कसल्याही प्रकारचं संदुषण झालेलं नाही...
अरे हो, हे तर फारच सुरक्षित आहे... त्यामुळेच येथे वर्षानुवर्षेकाम करणाऱ्या आमच्या इंजिनिअरांना काहीही होत नाही... आत्ता आलं लक्षात....
अगदी बरोबर... चला, मी आता तुम्हाला सर्वांना टरबाइन हॉलमध्ये घेऊन जातो...
(सगळे लोक टरबाइन हॉलमध्ये पोहोचतात.)


हे पहा, हे टरबाईन हॉल आहेत,
येथेच जनरेटरच्या मदतीने वीज निर्माण
केली जाते ,,,,
याच्याबरोबर आपण सर्वजण पहात आहात की
येथे खूप पंप व उपकरणे आहेत... या सर्वांचा
उपयोग उष्णता नियंत्रित करण्यासाठी केला जातो.
अरे बापरे ! हे तर केवढे मोठे आहे... खरंच, किती
मजा येते आहे या सर्व गोष्टी पाहताना...
(सर्वजण आश्चर्यचकित
होऊन एकमेकांकडे
पाहतात....)
चला, आता मी तुम्हाला कंट्रोल रुममध्ये
घेऊन जाणार आहे....
(सर्व लोक कंट्रोल रुममध्ये पोहोचतात....)
कंट्रोल रुमचे दृश्य ....
येथे काम करणाऱ्या
लोकांचे दृश्य....
हे पहा... ही अणू वीज केंद्रातील
कंट्रोल रुम आहे... येथूनच सर्व
प्रक्रियांचे संचालन केले जाते...


हे लाल... पिवळे... हिरवे रंगाचे इतके सारे दिवे ! यांचं काम तरी काय आहे?
गंगूताई, हे सर्व विजेशी संबंधित वेगवेगळ्या गोष्टीं मोजण्यासाठी असतात... म्हणजे असं की किती वीज निर्माण केली जाते आहे... त्यावर नियंत्रण कसे आहे.... इत्यादी... त्याचबरोबर कोणत्याही प्रकारच्या संकटाच्या वेळेस अणू वीज केंद्राला इथूनच पूर्णत: बंद केले जाऊ शकते, ज्यामुळे आपले अणू वीज केंद्र सुरक्षित राहू शकेल.
इथे दिवसरात्र लोक असतात का?
होय, येथे चोवीस तास आमचे प्रशिक्षित इंजिनिअर ड्यूटी करीत असतात... आणि अणू वीज केंद्राशी संबंधित इतर सर्व पद्धती व प्रक्रियांचीही कार्यवाही करतात. आता मी तुम्हा लोकांना बाहेर घेऊन जातो....
(अमितकुमार सर्व लोकांना घेऊन बाहेर येतात...)


अस्सं, पण या संपूर्ण प्रक्रियेतून काही कचरादेखील निघत असेल ना? त्याचं काय होतं? कारण आम्ही ऐकलं आहे की त्यातूनही खूप किरणोत्सर्ग बाहेर पडतो....
अगदी बरोबर विचारलंत.... खरं तर अणू उर्जेतून वीज निर्माण करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेतून फारच कमी प्रमाणात कचरा बाहेर टाकला जातो आणि वीज तयार करण्यासाठी जे इंधन वापरले गेल्यानंतर शिल्लक राहते त्याला आम्ही पाण्याच्या खूपच खोल टाकीत कित्येक वर्षे ठेवतो, किरणोत्सर्ग बाहेर पसरू नये म्हणून... त्यानंतर आपण ते पुन्हा वापरात आणू शकतो... परंतु कोळसा आणि इतर स्रोतांतून बाहेर येणारे $CO_2$, $SO_2$ तसेच $NO_2$ हे वायू अत्यंत हानीकारक असतात आणि वातावरणाला दूषित बनवतात.


याचबरोबर आपल्या देशात या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचे तंत्रही पूर्णत: विकसित झालेले आहे. आणि जो काही कचरा निघतो त्याला आम्ही उच्च तंत्रज्ञानावर आधारित यंत्रांच्या सहाय्याने कॉम्पॅक्ट करतो (आकारमान कमी करतो) आणि जमिनीखाली काँक्रीट आणि सिमेंटने बनवलेल्या टाक्यांमध्ये सुरक्षित रूपात सुरक्षितपणे ठेवतो आणि तो कित्येक वर्षांपर्यंत जमीनीच्या आतच सुरक्षित स्थितीत राहतो, ज्यामुळे वातावरणात कोणतेही किरणोत्सर्ग पसरणार नाहीत... समजलं?
समजलं, सर...
आता मी तुम्हाला अशा ठिकाणी घेऊन जाणार आहे जिथून आम्ही अणू वीज निर्मितीसाठी पाणी घेतो...
(सर्व लोक खालच्या बाजूला पाण्याच्या स्रोताच्या दिशेने जातात)


तुम्हाला दिसतं आहे ती अशी जागा आहे जिथून आम्ही वीज निर्माण करण्यासाठी पाण्याचा उपयोग करतो आणि पुन्हा आम्ही त्या पाण्याला तिथेच आणून सोडतो...
म्हणजे हे पाणी पुन्हा झऱ्यांमध्ये, नद्यांमध्ये किंवा समुद्रात जाऊन मिळतं? हे तर खूपच गरम असणार...
याच्यामुळे तर पाण्यात राहणारे मासे आणि इतर जीवजंतूंचीही हानी होत असणार...
अशामुळे तर पाण्यात किरणोत्सर्गही पसरत असणार.....
तुम्ही लोक हेच पाणी पिण्यासाठीदेखील वापरता का?
२३


अरे अरे, सगळे एकदम प्रश्न विचाराल तर मी त्यांची उत्तरं तरी कशी देऊ? मी एकेका प्रश्नाचं उत्तर देतो... हे अगदी खरं आहे की वीज केंद्रातून बाहेर येणारं पाणी थोडं गरम असतं, परंतु त्यामुळे पाण्यात राहणाऱ्या जीवजंतूंवर, विशेष करून माशांवर काहीही परिणाम होत नाही.... आणि मासेही चांगल्या प्रकारे जगू शकतात... तुम्ही थोडे जवळ येऊन नीट पहा... आणि पाण्यात किरणोत्सर्ग पसरण्याबद्दल म्हणाल तर मी तुम्हाला सांगतो की तसं काहीही होत नाही....
(गणपत जवळ जाऊन नीट पाहतो... त्याला पाण्यात काही मासे पोहताना दिसतात... )
खरंच, आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबद्दल सांगायचं तर आम्ही सारे लोक हेच पाणी पितो.... कारण हे पाणीदेखील इतर पाण्यासारखंच सामान्य पाणी आहे.... जसे तुम्ही लोक तुमच्या घरी पाणी स्वच्छ करून पिता त्याच प्रमाणे हे पाणी वापरात आणण्यापूर्वी स्वच्छ केलं जातं... त्यानंतरच पाणी वीज केंद्र आणि शेजारीच वसवलेल्या निवासी कॉलनीपर्यंत पोचवलं जातं,... समजलं?
अरे हो, इथे तर खूप मासे पोहोतायत... याचा अर्थ लोक मुद्दामच अफवा पसरवत आहेत...
मग काय, आम्ही जे स्वादिष्ट आणि गोड पाणी प्यायलं ते इथलंच होतं का ?
होय, ते इथलंच होतं.... अगदी बरोबर सांगितलंत तुम्ही... हा हा हा (हसत)




आणखी एक गोष्ट पहा, अणू वीज केंद्र येथून किती उंचीवर तयार केलेले आहे... याच प्रकारे समुद्र किनाऱ्यावर तयार केलेल्या आमच्या इतर अणू वीज केंद्रांची बांधणीही अगदी उंच ठिकाणी केली जाते.... कारण उंची आणि योग्य अंतर यांच्यामुळे पाण्याच्या लाटांपासून अणू वीज केंद्रे सुरक्षित राहतात... त्यामुळेच आपल्याला सुनामीला घाबरण्याचं काहीच कारण नाही...
तुम्ही अगदी ठीक सांगताय... सगळं काही अगदी डोळ्यांसमोर आहे...
तुम्ही सर्वांनी अणू वीज केंद्र तर हिंडून पाहिलंत आता मी तुम्हाला गावात आणि कॉलनीत घेऊन जातो... परंतु त्यापूर्वी मी तुम्हाला अशा एका ठिकाणी नेणार आहे, जिथे तुम्हा सर्वांनाच खूप मजा वाटेल...
(सर्वजण तिथून निघतात आणि त्यांना काही अंतरावर एक नाव दिसते... ज्यावर बसून काही मासेमार मासे पकडतात..)
काय नंदू? कसं काय? आजकाल खूपच मासे पकडतोयस..
राम राम साहेब.. ही सगळी तुम्हा लोकांची कृपा आहे... जर तुम्ही लोकांनी आम्हाला मासे पकडण्यासाठी नाव दिली नसती तर आम्ही तर भुकेने मरूनच गेलो असतो... सारे मासेमार लोक आपले आभारी आहेत...







(एका सुंदर फळबागेचे दृश्य... जिथे खूप आंब्याची, केळी व टरबुजाचा वेली दिसून येत आहेत...)






आता आपण सर्व इथे बसून या स्वादिष्ट फळांचा आस्वाद घेऊ या...
(आंबे खाताना...) अरे वा, हा तर खूपच गोड, रसदार आणि स्वादिष्ट आहे... मजा आली खाताना...
मी तर केळीच खाणार....
पण साहेब, अणू वीज केंद्राच्या जवळ असूनदेखील इथे इतकी फळे आहेत, तीदेखील खूपच स्वादिष्ट... मग किरणोत्सर्गाचा यांच्यावर काही परिणाम होत नाही का?
हीच गोष्ट आम्हाला लोकांपर्यंत पोचवायची आहे, की अणू वीज केंद्रांच्या जवळपास असणारी जागा स्वच्छ आणि हिरवी असते आणि इथल्या फळांच्या बागांवर त्याचा काहीही परिणाम होत नाही. वेळोवेळी आम्ही या सर्वांचे नमुने घेतो व त्यांची प्रयोगशाळांमध्ये तपासणी करतो, ज्यामुळे आम्हाला त्यांच्या शुद्धतेबद्दल माहिती मिळू शकेल, तसंच याबरोबरच उच्च तंत्रज्ञानाच्या उपयोगाने आम्ही बियांची गुणवत्ताही वाढवतो, ज्यामुळे आमचे आंबे, केळे, पेरू आणि इतर फळे आणखीच स्वादिष्ट बनतात, आणखी एक म्हणजे जर तुम्ही वीज केंद्राच्या आत फिरूनदेखील तुमच्यावर कोणताही किरणोत्सर्ग लागला नाही , तर इथे त्याचा कसा काय परिणाम होईल?


होय समीरदादा, तू अगदी बरोबर सांगत होतास... आता आम्हाला पूर्ण विश्वास वाटायला लागलेला आहे की अणू वीज केंद्राच्या स्थापनेनंतर आमची शेतं, आंब्याच्या बागा, पिके, मासे सगळे सुरक्षित राहतील... त्यांच्यावर यांचा काहीच परिणाम होणार नाही...
समीरदादा, आजची सहल तर आम्ही आयुष्यभर विसरू शकणार नाही...
सगळे लोक थोड्या वेळ गप्पांमध्ये घालवल्यानंतर फळे खाऊन नावेत पुन्हा येऊन बसतात..
चला, आता मी तुम्हा साऱ्यांना गावात आणि कॉलनीत घेऊन जातो...
(नाव किनाऱ्यावर येऊन थांबते... सर्व गावकरी नावेतून उतरून कॉलनीच्या दिशेने चालू लागतात... रस्त्यात त्यांना एक वृद्ध गृहस्थ भेटतात, ते त्यांच्या नातवाला कडेवर घेऊन चाललेले असतात....)
अरे सिन्हा साहेब, नमस्कार ! काय, कसं काय? आज तुम्ही तुमच्या नातवाला घेऊन कुठे निघालात?
नमस्कार कुमार साहेब ! काही नाही, सहजच हिंडायला निघालोय... तुम्ही सांगा, आज इतक्या लोकांना घेऊन कुठे निघालात?



काही नाही... हे सगळे आमचे मित्र जगदीशपूर गावातून आलेले आहेत, त्यांना मी कॉलनी आणि गावातून हिंडवून आणण्यासाठी निघालोय... गणपतकाका, हे आहेत सिन्हा साहेब... यांनी 40 वर्षेअणू वीज केंद्रात काम केलेले आहे आणि सेवानिवृत्तीनंतर ते आता त्यांच्या कुटुंबासह इथेच राहात आहेत... त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आणि एक खट्याळ नातू आहे... मुलगी परदेशात अभ्यास करते आहे...आणि मुलगाही एका चांगल्या कंपनीत उच्च पदावर नोकरी करतोय... आपण सारे पाहात आहातच... आत्तादेखील सिन्हा साहेब किती तंदुरुस्त आहेत ते..
होय, त्यांना पाहून तर कोणी म्हणणार देखील नाही की ते सेवानिवृत्त झालेले आहेत आणि त्यांनी 40 वर्षेअणू वीज केंद्रात काम केलेले आहे असं...
(सिन्हा साहेबांशी बोलल्यानंतर ते सारेजण पुढे जातात... रस्त्यात गाव लागते... गावातील पक्के रस्ते, नाले, शौचालय, सामुदायिक केंद्र पाहून सर्वच आश्चर्यचकित होतात...)


अरे वा, किती पक्के आणि स्वच्छ रस्ते आहेत... नाले तयार केले आहेत...
अरे ते पहा... पाण्यासाठी जागोजागी हँडपंपदेखील लावलेले आहेत...
हे तुम्ही लोकांनी लावलेले आहेत का?
होय, हा सारा विकास गावात अणू वीज केंद्र तयार झाल्यानंतर झालेला आहे...
पहा काका, मी सांगितलं होतं ना...



शासकीय कन्या शाळा
(थोड्या वेळाने त्यांना रस्त्यात प्राथमिक विद्यालय दिसते... शासकीय कन्या शाळा, तिथे विद्यार्थ्यांना वह्यापुस्तकांचे मोफत वाटप चाललेले होते....)
अरे वा! गावात मुलींसाठीदेखील शाळा आहे.. आमच्या गावात तर मुलांसाठीदेखील शाळा नाही... इथे तर मुलींसाठीदेखील शाळा आहे....
(थोडे दूर शिवण केंद्र दिसते.. तेथे खूप स्त्रिया शिवणकाम शिकत आहेत...)
Silayi Ghar
अरे, हे तर शिवण केंद्र दिसतंय... यांना ही शिवण यंत्रे कोणी दिली?
या लोकांना आम्ही स्वयंरोजगारासाठी साधने मिळवून दिली... या सर्व मुली अणू वीज केंद्रात वापरले जाणारे कपडे शिवतात... आणि आम्ही ते योग्य किंमतीला विकत घेतो...
अरे वा ! हे तर फारच चांगलं आहे....


पुढे गेल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रात खूपच गर्दी दिसते आहे... तेवढ्यात तेथून स्त्री डॉक्टर बाहेर येताना दिसतात...
नमस्ते डॉ. आभा ! कशा आहात?
HOSPITAL
अरे, नमस्ते कुमार साहेब ! मी अगदी ठीक आहे, तुम्हीच सांगा...
काय विशेष? इथे आज खूपच गडबड दिसते आहे... काही खूशखबर आहे की काय?
होय, आज गावातल्या पांडू मच्छीमाराच्या बायकोला म्हणजेच फुलवाला जुळी मुले झालेली आहेत... सर्व लोक त्यांचं अभिनंदन करायला आले आहेत.. त्यामुळेच इतकी गर्दी आहे...
अरे वा ! त्यांना माझ्यातर्फेही शुभेच्छा द्या...
पाहिलंत गंगूताई... सविताकाकू किती चुकीच्या गोष्टी बोलत होत्या ते... आज तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहिलंत की अणू वीज केंद्राच्या आसपास राहिल्यामुळे कोणत्याही प्रकारे किरणोत्सर्ग पसरत नाही... नाहीतर फुलवा कधी आई होऊ शकलीच नसती...
चला, आता मी तुम्हाला सर्वांना कॉलनी दाखवतो... कॉलनी थोडी दूर आहे म्हणून आपण सगळेजण बसने जाऊ या...
होय, समीर दादा, तू खरं सांगत होतास...आता मी गावी परत गेल्यावर सविताचे कानच उपटेन चांगले...
(सर्व लोक गंगूताईचे बोलणे ऐकून जोराने हसू लागतात.....)


(सर्व बसमध्ये बसतात आणि थोड्याच वेळात कॉलनीत पोहोचतात... कॉलनीचे दृश्य: घरांचे दृश्य, सामुदायिक केंद्र, दुकाने, पक्के रस्ते, दिवे, झाडांच्या रांगा, मोटारी इत्यादी...)
अरे ही तर फारच सुंदर कॉलनी आहे! सर्व गोष्टी फारच व्यवस्थित आणि सुंदर रीतीने तयार केलेल्या आहेत... स्वच्छतेकडेही विशेष लक्ष दिलेलं आहे...)
अरे, ही कॉलनी पाहिल्यानंतर मला तर इथेच राहावंसं वाटू लागलेलं आहे... (सगळे लोक हसायला लागतात)
तुम्ही पाहिलंत की अणू वीज केंद्र निर्माण झाल्यानंतर त्याच्या जवळपासच्या भागाचा कशा रीतीने विकास होतो ? मला पूर्ण आशा आहे की तुम्हा सर्वांना इथे फिरल्यानंतर खूप गोष्टींबद्दल माहिती मिळालेली असेल... आणि तुमच्या मनात जर काही शंका, प्रश्न असतील तर ते दूर झाले असतील...
होय साहेब... खरं तर जेव्हा समीरने आम्हाला सांगितलं होतं तेव्हा आम्हाला ते खरं तर वाटलं होतं, पण आज अणू वीज केंद्र प्रत्यक्ष फिरून पाहिल्यानंतर तर आमच्या सगळ्याच शंका दूर झाल्या....
होय, आमचे सगळे संशय आणि गैरसमज दूर झाले....
होय, आता आम्हाला सगळ्यांनाच कळून चुकलं आहे की विकासाचा अर्थ काय? विकास का आवश्यक आहे?
आणि हो, आता आम्हीदेखील कौलारू घरांमध्ये राहणार नाही... आमची घरेदेखील पक्की बनतील... (सगळेच हसू लागतात....)




गणपत आणि गावकरी अणू वीज केंद्राला भेट देऊन आल्यानंतर काय झाले?

जेव्हा गणपतने इतर लोकांना अणू वीज केंद्राबद्दल सांगितले तेव्हा काय झाले?

जगदीशपूर गावात अणू वीज केंद्र तयार होऊ शकले का?

हे सर्व जाणून घेण्यासाठी प्रतीक्षा करा, पुढल्या अंकाची ....

**"अणू ऊर्जा... देशाची ऊर्जा...**
**स्वच्छ ऊर्जा.... स्वच्छ भारत...."**

बदलून गेला
**गणपत...**
जगदीशपूर एक आदर्श गाव बनले त्याची गोष्ट

क्रमश:



एनपीसीआईएल
NPCIL

## न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

द्वारा
लोकहितार्थ प्रसिद्ध


यांच्याद्वारे प्रकाशित केले:
कॉर्पोरेट प्लॅनिंग आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन संचालनालय (सीपी आणि सीसी)
६-एस-१४, विक्रम साराभाई भवन, अणुशक्तीनगर, मुंबई - ४०० ०९४
ई मेल: cpcc@npcil.co.in
वेबसाईट : www.npcil.nic.in